# शेतकरी व विक्रेत्यांना एकत्र आणणारा डिजिटल प्लॅटफॉर्म

पुणे : भाज्या,फळे आणि डाळींच्या उपलब्धतेबद्दल व त्यांच्या किंमतीविषयी माहिती देणारा तसेच शेतातून टेबलपर्यंत आणण्यासाठी पडणारा आर्थिक ताण कमी करणारा एक अनोखा डिजिटल प्लॅटफॉर्म पुणेस्थित मायविश्व टेक्नोलॉजीज तर्फे सादर करण्यात आला. फार्मर्सओआरजी. इन (farmersorg.in ) हा प्लॅटफॉर्म शेतकरी, ग्राहक, घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना एकत्र आणेल. यामुळे शेतकऱ्यांची सोय होणार असून त्यांना किरकोळ,घाऊक विक्रेते किंवा मोठ्या संस्था तसेच सोसायट्यांच्या गरजा समजतील व ते त्याप्रमाणे प्रतिसाद देतील. प्लॅटफॉर्म पोर्टल तसेच अॅन्ड्रॉईड व आयओएस अॅपच्या रूपात उपलब्ध आहे.

हा डिजिटल प्लॅटफॉर्म शेतकऱ्यांना त्यांच्या विक्री योग्य वस्तूंची यादी संभाव्य ग्राहकांसाठी प्लॅटफॉर्मवर पोस्ट करण्यास मदत करेल.तसेच ग्राहकांना देखील त्यांची खरेदीची यादी संभाव्य विक्रेत्यांसाठी पोस्ट करता येईल. मायविश्व टेक्नॉलॉजीजचे संचालक मंदार जोगळेकर म्हणाले की, शेतकरी घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना सोपा फॉर्म भरून तो साईटवर अपलोड करावा लागेल. फॉर्ममध्ये ठिकाण, फळांची, भाज्यांची व डाळींची उपलब्धता व त्यांचे प्रमाण व दर्जा यांची सखोल माहिती असेल.या माहितीचा उपयोग किरकोळ व घाऊक विक्रेते तसेच सामान्य माणसांना त्यांच्या गरजेच्या वस्तू मिळविण्यासाठी होईल. या प्रक्रियेनंतर कोणताही आर्थिक व्यवहार किंवा डिलिव्हरी प्रक्रिया होणार नसल्याने ही ई-कॉमर्स साईट ठरत नाही. परंतु यामुळे शेतकर्यांची सोय होणार असून त्यामुळे संस्था व लोकांशी जोडण्यास तसेच शेतापासून ते टेबलापर्यंतचा आर्थिक ताण कमी होण्यास मदत होणार आहे.